**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः 25.11.2022** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

अमृत महाआवास अभियानाचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रारंभ
दुष्काळग्रस्त भागात पुराचं पाणी वळवण्याच्या प्रकल्पाला जागतिक बॅंकेने अर्थसहाय्य करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन
दिव्यांग सक्षमीकरणात राज्याला सात पुरस्कार जाहीर
55 व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला संघाला विजेतेपद
आणि
भारत - न्यूझीलंड दरम्यान 50 षटकांचा पहिला सामना आज ऑकलंडमध्ये

**अमृत महाआवास**

2024पर्यंत सर्वांसाठी घर देण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं उद्दिष्ट असून आता 'अमृत महाआवास योजना' 2022 – 23 अभियानातील 5 लाख घरं पुढील 100 दिवसात बांधली जातील,असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सांगितलं.विक्रमी वेळेत ही घरकुलं बांधली जाणार असून पंतप्रधानांच्या उपस्थितीत गृहप्रवेश करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित 'अमृत महाआवास अभियान 2022-23' चा राज्यस्तरीय शुभारंभ आणि पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर,ग्रामविकास मंत्री  गिरीष महाजन, यावेळी उपस्थित होते.
जे नागरिक महाआवास योजनेच्या निकषात बसत नाहीत, अशा नागरिकांना निकषात बसण्यासाठी नवीन योजना तयार करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमात केली.उत्कृष्ट काम केलेल्या अधिकाऱ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

**मुख्यमंत्री**

मराठवाडा आणि विदर्भातल्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृषी प्रकल्पांसोबतच, दुष्काळग्रस्त भागात पुराचे पाणी वळवण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्य शासनानं तयार केला असून,त्यासाठी जागतिक बॅंकेने अर्थसहाय्य करावं,असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं.जागतिक बॅंकेचे भारतातील प्रमुख,ऑगस्टे तानो कौमे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेतली.या बैठकीत महाराष्ट्र कौशल्य विकास

प्रकल्प, हवामान बदल आणि त्यामुळे कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम, बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्प, बेस्टसाठी इलेक्ट्रीक बसेस याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.जागतिक बॅंकेच्या अर्थसहाय्यातून महाराष्ट्रात कौशल्य विकास कामं सुरू असून,भविष्यातही अशाच प्रकारे राज्यातल्या  विविध क्षेत्रातील प्रकल्पांना सहकार्य करण्याचं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं.

**दिव्यांग पुरस्कार**

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीनं देण्यात येणाऱ्या दिव्यांग सक्षमीकरणात महाराष्ट्राला सात पुरस्कार जाहीर झाले  आहेत.'सुगम्य भारत अभियान' ची अंमलबजावणी करणारे सर्वश्रेष्ठ राज्य म्हणून यंदाच्या वर्षासाठी हा पुरस्कार पुण्याच्या दिव्यांग कल्याण आयुक्तालयाला जाहीर झाला आहे.सर्वश्रेष्ठ दिव्यांग व्यक्ति पुरस्कार अशोक तुकाराम भोईर, विमल गव्हाणे, डॉ. शुभम रामनारायण धूत, जयसिंग चव्हाण याना जाहीर झाला असून ,अकोला जिल्हा परिषद आणि औरंगाबादच्या महात्मा गांधी सेवा संघ यांचाही या राष्ट्रीय पुरस्कारात समावेश आहे.जागतिक दिव्यांग दिनानिमित्त येत्या 3 डिसेंबर रोजी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत या पुरस्कारांचे वितरण होणार आहे,.

**कुलगुरू**

आत्मनिर्भर भारताच्या अभियानाला चालना देण्यासाठी विद्यापीठाने आत्मनिर्भर विद्यापीठ होण्याचा संकल्प करावा, असं आवाहन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी काल केलं. राजभवनात राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या संयुक्त मंडळाची बैठक राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली झाली.त्यावेळी ते बोलत होते.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य आणि रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि सर्व विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते.महाराष्ट्र शैक्षणिकदृष्ट्या अग्रेसर राज्य आहे; हा आलेख नेहमीच चढता ठेवण्यासाठी आपण प्रयत्न करत आहात असं प्रतिपादन कोश्यारी यांनी यावेळी केलं.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र अग्रेसर राहील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल 5 ट्रिलियन डॉलरच्या दिशेने सुरू असून 2030पर्यंत हे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यापीठ ही मोठी शक्ती आहे. त्यामुळे विद्यापीठानी शैक्षणिक गुणवत्ता आणि सुलभता याकडे विशेष लक्ष द्यावे,असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

**प्रल्हादसिंह पटेल**

केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी जल जीवन अभियानाअंतर्गत महाराष्ट्रातील 100 टक्के कामे येत्या 2 वर्षात पूर्ण होतील आणि राज्याच्या ग्रामीण भागातील प्रत्येक घरात नळाद्वारे स्वच्छ पाण्याचा पुरवठा होईल असा विश्वास केंद्रीय जलशक्ती आणि अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री प्रल्हादसिंह

पटेल यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत व्यक्त केला.शिरुर लोकसभा मतदार संघाचा दोन दिवसांचा दौरा केल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. शिरुर लोकसभा मतदार संघात भाजपने यापूर्वी कधीही निवडणूक लढवली नसल्यानं या मतदार संघाकडे पुरेसे लक्ष दिलं गेलेलं नाही हे मान्य करतानाच आगामी काळात निवडणूक लढवायची झाल्यास बरीच तयारी करावी लागेल असं पटेल म्हणाले.मात्र त्याचवेळी आम्ही निवडणूक लढवतो ती जिकंण्यासाठीच हे देखील त्यांनी स्पष्ट केलं.पुणे जिल्ह्याच्या अनेक भागात कांदा आणि बटाट्याचे पीक मोठ्या प्रमाणावर येते हे लक्षात घेऊन त्यावरील प्रक्रिया उद्योग पुणे जिल्ह्यात सुरु व्हावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**ज्योतिरादित्य शिंदे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार आणि विकासाचं धोरण पुढे नेण्यासाठी तसंच संघटनात्मक मोर्चेबांधणी करुन कार्यकर्त्यांमध्ये नवी शक्ती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणार आहे,असं केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री जोतिरादित्य शिंदे यांनी काल कोल्ह्पुरात सांगितलं.भाजपाच्या लोकसभा मतदार संघाच्या प्रवास योजने अंतर्गत कोल्हापूर मतदार संघाच्या दौऱ्यावर ते आले होते;त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी साठी अभिवादन करुन त्यांनी आपल्या दौऱ्याची सुरुवात एकली.राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य सदैव प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.या दौऱ्यात त्यांनी विधानसभा मतदार संघातील नेते,पदाधिकारी, आघाडी-मोर्चा पदाधिकारी यांच्यासोबत संघटनात्मक आढावा बैठक घेतली तसंच स्थानिक नागरिकांसह कार्यकर्त्यांसोबत त्यांनी संवाद साधला.

प्राचीन भारतीय योगशास्त्र आयुर्वेद अशा विविध शास्त्रांचं महत्त्व आता जगातल्या विविध देशांना पटायला लागलं आहे.त्यातून या अभ्यासाचं आणि माहितीच आदान प्रदान वाढविण्याच्या दृष्टीने अनेक प्रयत्न केले जात आहेत.त्यातूनच एक अभिनव उपक्रम नुकताच पुण्यामध्ये आकाराला आला...

जपानमधील 40 विद्यार्थ्यांनी पुण्यामध्ये येऊन आयुर्वेदाचे धडे गिरविण्याचा ! त्याबाबतचा हा विशेष वृत्तांत...

जपानमधील विविध भागातील 40 विद्यार्थ्यांनी आयुर्वेद अध्ययनासाठी पुण्यात मुक्काम केला आणि संपूर्ण गुरुकुल पद्धतीने या ज्ञानाची तोंडओळख करून घेत आयुर्वेदाबरोबरच भारतीय योगशास्त्र,पाकशास्त्र,संगीतशास्त्र, क्रीडा प्रकार,लोककला, नृत्यकला,शास्त्रीय संगीत यांचीही ओळख करून घेतली.पुण्याजवळील वाघोली इथल्या भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्टमध्ये हा उपक्रम पार पडला. अशा पद्धतीचे उपक्रम मोठ्या प्रमाणात कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आपल्या अपेक्षा व्यक्त करताना वैद्य सुकुमार सरदेशमुख म्हणाले,

**तुम्हाला नवल वाटेल की 40 आंतरराष्ट्रीय विद्यार्थी जपान मधला या गुरुकुलाला आले आणि सहभागी झाले याच्यामध्ये आयुर्वेदातील मार्गदर्शन विविध विषयांवर करून बरोबर असलेल्या त्यांचं चर्चा त्याचबरोबर वनस्पती दर्शन गोशाळा योगा आणि आपल्या ज्या बाकीच्या कला आहेत की आपली शास्त्र आहेत आपले जे वेद आहेत त्याच्या बाबतीतले ते त्यांची ओळख होण्यासाठी तोंड ओळखून देणे हे याच्या मागचा येत होता व त्याच्यामध्ये धन्वंतरी याग असेल त्याच्यानंतर आपण आंघोळी असेल दानपट्टा व सारखे जी मर्दानी खेळ आहेत ढोल ताशा किंवा संगीतामध्ये आपलं संतूर वादन आहे का भरत नाट्यम आहे अशी विविध प्रकारच्या गोष्टींची त्यांची आपण तोंड ओळख करून दिली आणि हेच आपलं हे होतं माननीय नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली आयुष मंत्रालयाचा सुरुवात झाली आणि आयसीसीआर हे पण आता आयुर्वेद प्रसार करण्यासाठी प्रचंड प्रयत्न करीत आहे पण माझी एवढीच विनंती आहे की गुरुकुल पद्धतीने परत रुजवली गेली पाहिजे आणि त्याच्यामध्ये जास्तीत जास्त अंतरराष्ट्रीय विद्यार्थी आपल्याकडे कशी येतील हे त्याच्यामागे सरकारने आपल्याला मदत केली तर आपण नक्की पूर्वीसारखे गुरुकुल पद्धतीचे शिक्षण होता गुरु आणि शिष्याचा ते परत आपण रोज होऊ शकतो असं मला वाटतं**

जपानी विद्यार्थ्यांचा हा प्रयत्न उगवत्या सूर्याच्या देशात निरामय जीवनाची नवी पहाट उगविण्यासाठी प्रशंसनीयच म्हणायला हवा.आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून स्वाती महाळंक.

**पवार ठाकरे**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी;काल पत्रकार परिषद घेऊन;राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या वक्तव्याचा निषेध केला.राज्यपालांच्या या विधानाची दखल आता राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी घ्यावी, असं पवार म्हणाले.तर केंद्र सरकारनं राज्यपालांना त्वरित माघारी बोलावून घेतलं नाही तर महाराष्ट्र प्रेमी आंदोलन करतील,असा इशारा ठाकरे यांनी दिला.

**सीमाप्रश्न**

सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात असताना कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी त्याबाबत बेजबाबदार,प्रक्षोभक वक्तव्यं करणं निषेधार्ह असून हे महाराष्ट्र सहन करणार नाही,अशी प्रतिक्रिया विधानसभेतले विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिली आहे.त्यावर उत्तर देताना महाराष्ट्रातील एक इंचही जागा कुठे जाऊ देणार नाही,सीमा भागातील ज्या 40 गावांच्या समस्या आहेत त्या सोडवण्याची जबाबदारी राज्य सरकारची असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं.राज्याची निर्मिती झाली तेव्हापासून कर्नाटक - महाराष्ट्र सीमावाद सुरु आहे; त्यामुळे या सीमावादात कोणीही पक्षीय वाद आणू नये; याप्रकरणी सर्वोच्च न्यायालय योग्य तो निर्णय घेईल,आपला सीमाभाग आपल्याला परत मिळेल, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल माध्यमांशी बोलताना स्पष्ट केलं.

**उदय सामंत**

मुंबईतल्या चर्नीरोड इथं मराठी भाषा भवन आणि नवी मुंबईतल्या ऐरोली इथं उपकेंद्र अशा दोनही प्रस्तावित इमरतींच्या उभारणीच्या कामाला येत्या पंधरा दिवसांत सुरूवात होणार असल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी काल नवी मुंबईत दिली. ऐरोली इथल्या प्रस्तावित मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या जागेची पाहणी केल्यानंतर सामंत यांनी त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला.

**नाशिक ग्रंथोत्सव**

ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून शहरासोबतच तालुका पातळीवर वाचन संस्कृती वृद्धींगत होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं  नाशिक जिल्ह्याचे संपर्कमंत्री दादाजी भुसे यांनी केलं.नाशिक ग्रंथोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते काल बोलत होते.

**ग्रंथ दिंडी**

धुळे इथल्या  जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातही  कालपासून ग्रंथ दिंडी काढून ग्रंथोत्सवाला सुरवात झाली.

**अथेलेटिक**

अमरावतीमध्ये आयोजित विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये शासकीय तंत्रनिकेतन विद्यार्थ्यांनी अथेलेटिक्समध्ये वैयक्तिक आणि सांघिक स्वरूपात विजेतेपदाची 5 पदकं आणि उपविजेता म्हणून 4 पदकं मिळविली.

**खोखो**

उस्मानाबादमध्ये झालेल्या 55 व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत यजमान महाराष्ट्राच्या महिला संघाने विजेतेपद कायम राखलं आहे.तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या महिला संघाने भारतीय विमान प्राधिकरण संघावर 11-9 असा शानदार विजय मिळवला.महाराष्ट्राच्या महिलांचं हे 24 वं  अजिंक्यपद ठरलं आहे. पुरुष गटात भारतीय रेल्वेने यजमान महाराष्ट्रावर 14-12 असा विजय मिळवित हॅटट्रिक केली.अपेक्षा सुतार राणी लक्ष्मीबाई पुरस्काराची मानकरी तर अक्षय गणपुले एकलव्य पुरस्कारचा मानकरी ठरला.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान 50 षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज न्यूझीलंडमधील ऑकलंड इथल्या इडन पार्क मैदानावर खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी सात वाजता सामना सुरू झाला आहे. रोहित शर्मा आणि के एल राहुल यांच्या

अनुपस्थितीत शिखर धवन याच्याकडे कर्णधारपदाची धुरा आहे. या मालिकेतला दुसरा सामना येत्या रविवारी तर तिसरा सामना बुधवारी खेळला जाईल.

**हवामान**

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे; राज्यात  अन्यत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**